## निशाणी क्र. ११ खालील अर्ज

अपराध क्रमांक १४२/२०२२ मध्ये जप्त करण्यात आलेले वाहन अर्जदाराचे सुपुर्त करण्याकरिता फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४५१ अन्वये सदर अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

०२. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे ती मयत भिमराव रामा राउत यांची पत्नी आहे. तसेच पोलीस ठाणे भोकरदन यांचे मार्फत नोंदविण्यात आलेल्या अपराध क्र. १४२/२०२२ मध्ये जप्त करण्यात आलेली बजाज प्लॅटीना मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच.–२०–बी.डी.–७११० ज्याचा Chassis no. MD2DDDZZZPWG65393 and Engine no. DUMBPG45035 ची अर्जदार ही मालक असून सदर वाहन पोलीस ठाण्यामध्ये पडून राहील्यास त्यांचे नुकसान होईल. करिता ते अर्जदाराचे सुपुर्त करण्याबाबत त्याने विनंती केली आहे.

०३. सरकारी विधीज्ञ यांनी सदर जप्त मुद्देमाल अर्जदाराच्या सुपूर्त करण्यास त्यांची हरकत असल्याचे सांगितले. अर्जदार याने स्वतः चे आधार ओळखपत्राची पडताळणीकृत प्रत दाखल केलेली आहे. तसेच अर्जदार यांनी दाखल केलेल्या वाहनाच्या आर. सी. च्या पडताळणीकृत प्रतिवरून सदर वाहन अर्जदाराचे मालकीचे असल्याचे स्पष्ट होते. सदर वाहन पोलीस ठाण्याच्या आवारात ठेवण्यात आलेले आहे. खटल्याचा निकाल लागेपर्यंत बराच वेळ लागणार आहे. अशा परिस्थितीत सदर वाहन पोलीस ठाण्याच्या आवारामध्ये विनाकारण पडून राहील्यास त्याचे नुकसान होईल. करिता सदर मुद्देमाल अर्जदाराचे सुपुर्त करणे योग्य होईल. परंतु सदर मुद्देमाल गुन्हयाच्या कामी जप्त करण्यात आलेले असल्याने ते अर्जदाराचे सुपुर्त करते वेळी त्याबाबत योग्य त्या अटी लादणे आवश्यक आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करते.

## आदेश

०१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. अपराध क्र. १४२/२०२२ पोलीस ठाणे, भोकरदन मध्ये जप्त केलेली बजाज प्लॅटीना मोटारसायकल नोंदणी क्र. एम.एच.–२०–बी.डी.–७११० ज्याचा Chassis no. MD2DDDZZZPWG65393 and Engine no. DUMBPG45035 ची अर्जदार भागीरीथाबाई भिमराव राउत याचे रक्कम रूपये १,००,०००/– च्या बंधपत्रावर (इंडेम्नीटी बॉड) वर सुपुर्त करण्यात यावे.

०३. अर्जदार याने सदर खटल्याचा निकाल लागेपर्यत वरील नमुद वाहनाचा रंग व त्याचे स्वरूपात बदल करू नये किंवा त्याची विक्री व हस्तांतरण करू नये व न्यायालय आदेश देईल त्याप्रमाणे खटल्याच्या कामी हजर करावी.

०४. अर्जदार याने सदर वाहन कोणताही गुन्हा करण्याचे कामी उपयोगात आणू नये.

स्वाक्षरित/–
(आर. व्ही. पाटील)
दिनांकः १६.११.२०२२. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
भोकरदन

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः यु. आर. दसरे
न्यायालयाने नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः १६.११.२०२२ स्वाक्षरित/–
लघुलेखकाची सही